मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# ठरलं! रवि लांडगे ठाकरे गटात प्रवेश करणार अन् आमदारकी लढणार

## मंगळवारी सकाळी सुमारे 500 गाड्यांसह मुंबईकडे रवाना होणार : उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत रवि लांडगे शिवसेनेत प्रवेश करणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडच्या राजकारणातील सर्वांचे लक्ष वेधलेले भोसरी विधानसभा मतदारसंघातील इच्छुक उमेदवार व माजी नगरसेवक रवि लांडगे यांनी अखेर शिवसेना उद्धव ठाकरे पक्षात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. रक्षाबंधनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे मंगळवारी (२० ऑगस्ट रोजी) मुंबईत मातोश्री येथे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत रवि लांडगे शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. या पक्ष प्रवेशाची भोसरी विधानसभा मतदारसंघात जय्यत तयारी सुरू आहे. रवि लांडगे हे मंगळवारी सकाळी सुमारे ५०० गाड्यांसह मुंबईकडे रवाना होणार आहेत. नागरिक आणि कार्यकर्त्यांशी चर्चा केल्यानंतक शिवसेना उद्धव ठाकरे गटात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. रक्षाबंधनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे मंगळवारी २० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता ते शिवसेना उद्धव ठाकरे गटात प्रवेश करणार आहेत. मुंबईत मातोश्री येथे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडणार आहे. या पक्ष प्रवेश सोहळ्याकडे संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहराचे लक्ष लागलेले आहे.

२०१७ मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीत रवि लांडगे हे भाजपचे बिनविरोध नगरसेवक म्हणून निवडून आले होते. त्यांच्या बिनविरोध निवडीसोबतच पिंपरी-चिंचवड महापालिकेतील भाजपच्या सत्तेचा श्रीगणेशा झाला होता. रवि लांडगे व त्यांचे कुटुंबीय हे पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात भाजपचे सर्वात जुने निष्ठावान म्हणून ओळखले जातात. भाजपचे राजकीय काम करताना रवि लांडगे यांचे चुलते व भाजपचे माजी शहराध्यक्ष दिवंगत अंकुशराव लांडगे यांना आपला जीव गमवावा लागला. दिवंगत अंकुशराव लांडगे यांनी देशात व राज्यात भाजपची सत्ता नसताना पिंपरी-चिंचवड महापालिकेत दोन अंकी नगरसेवक निवडून आणण्याची राजकीय किमया करून दाखविली होती. मात्र महापालिकेत सत्तेत आल्यानंतर त्याच कुटुंबाला कायम अपमानीत करण्याचे काम भाजपकडून झाले हे वास्तव आहे.



### "वेट अँड वॉच"ची भूमिका

» भाजपमधून बाहेर पडल्यानंतर रवि लांडगे यांनी अन्य कोणत्याही राजकीय पक्षात प्रवेश न करता "वेट अँड वॉच"ची भूमिका घेतली. आता विधानसभा निवडणुकीचे वारे सुरू झाले आहेत. भोसरी विधानसभा मतदारसंघातील नागरिकांचा रवि लांडगे यांनी आमदारकी लढवावी यासाठी दबाव वाढला आहे. त्यामुळे रवि लांडगे यांनी विधानसभा निवडणूक लढविण्याचा निर्णय घेत संपूर्ण भोसरी मतदारसंघ पिंजून काढला आहे. त्यांना नागरिकांकडून मिळणारा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. मात्र ते कोणत्या राजकीय पक्षाकडून लढणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते

### मातोश्री येथे पक्षप्रवेश सोहळा पार पडणार

» नागरिक आणि कार्यकर्त्यांशी चर्चा केल्यानंतक शिवसेना उद्धव ठाकरे गटात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. रक्षाबंधनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे मंगळवारी २० ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता ते शिवसेना उद्धव ठाकरे गटात प्रवेश करणार आहेत. मुंबईत मातोश्री येथे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडणार आहे.

# महापालिकेच्या इंदिरा गांधी रुग्णालयचा क्षयरोग मुक्तीसाठी 'निक्षय मित्र' उपक्रम

## कासारवाडी येथील महापालिकेच्या दवाखान्यात सांगवी टी. बी. युनिटच्या वतीने 'निक्षय मित्र' उपक्रम राबविण्यात आला

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या इंदिरा गांधी रुग्णालय सांगवी अंतर्गत कासारवाडी येथील महापालिकेच्या दवाखान्यात सांगवी टी. बी. युनिटच्या वतीने 'निक्षय मित्र' उपक्रम राबविण्यात आला.

याप्रसंगी महापालिकेचे अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, सांगवी रुग्णालयातील ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. तृप्ती सागळे, एमओ सीटीसी डॉ. गोविंदा नरके, नोडल अधिकारी डॉ. वैशाली भामरे, एमओ पीएचआय डॉ. अश्विनी सुडके यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम घेण्यात आला.

'निक्षय मित्र' उपक्रमात ३० क्षय रुग्णांना कासारवाडी येथील महापालिकेच्या दवाखान्यात पोषण आहार किटचे वाटप आरोग्य अधिकारी, उपस्थित मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आले. रुग्णांना निक्षय मित्र उपक्रमाबाबत डॉ. गोविंदा नरके यांनी माहिती दिली.कार्यक्रम प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते माऊली थोरात, प्रतिभा जवळकर, सीमा बोरसे आदी मान्यवर तसेच आरोग्य विभागाती ल कर्मचारी, क्षयरुग्ण, त्यांचे नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन निलेश जगताप, मंगल शिखरे, आशा सेविका, कर्मचारी यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. गणेश जवळकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.



### दिग्गज नेत्यांची भेट घेतली

» क्षय रोग आजाराचे निदान व उपचार महापालिकेच्या सांगवी रुग्णालयात मोफत उपलब्ध आहेत. रुग्णांनी आहार व औषधे वेळेत घेऊन उपचार पूर्ण करणे आवश्यक आहे. क्षय रोग हा संसर्ग जन्य आजार असल्यामुळे सर्वांनी काळजी घ्यावी. प्रत्येक खाजगी रुग्णालयांनी टी बी रुग्णाचे नोटिफिकेशन करून महापालिकेला सहकार्य करणे गरजेचे आहे. टी बी क्षय रुग्णांना सहा महिन्यांसाठी दत्तक घेण्यात यावे. त्यांना पोषण आहार यावेळेत उपलब्ध करून देण्यात यावा. यासाठी आपण निक्षय मित्र बनून क्षय रुग्णांसाठी काम करावे.

# ज्योती मेटेंकडे शिवसंग्राम पक्षाची धुरा

## पुण्यात शिवसंग्राम पक्षाची सर्वसाधारण सभा ज्योती मेटे यांच्या अध्यक्षेतेखाली सभा पार पडली, राज्यातील सर्व सभासद उपस्थितीत होते.

**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यात शिवसंग्राम पक्षाची सर्वसाधारण सभा पार पडली. ज्योती मेटे यांच्या अध्यक्षेतेखाली सभा पार पडली. राज्यातील सर्व सभासद उपस्थितीत होते.

राज्याच्या राजकारणात आगामी निवडणुकीची जोरदार तयारी सुरू केली आहे. अशातच आज पुण्यात आज शिवसंग्राम पक्षाची सर्वसाधारण सभा पार पडली. ज्योती मेटे (JYOTI METE) यांच्या अध्यक्षेतेखाली सभा पार पडली. राज्यातील सर्व सभासद उपस्थितीत होते. आगामी काळातील राजकीय भूमिका काय असणार यावर चर्चा झाली. यावेळी नवीन कार्यकारणी जाहीर झाली आहे. शिवाजी महाराज स्मारक आणि मराठा आरक्षण यावर चर्चा झाली, याबाबत त्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेणार आहेत. यावेळी शिवसंग्राम पक्षाच्या अध्यक्ष म्हणून ज्योती मेटे यांची निवड करण्यात आली आहे.

यावेळी निवडणुकीत शिवसंग्राम किमान ५ विधानसभा जागा लढवणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्याचबरोबर महायुती आणि महाविकास आघाडी या दोघांशी आमची चर्चा सुरू आहे. मुंबई कोकण विदर्भ मराठवाडा पश्चिम महाराष्ट्र पाच विभागात पाच जागा पाहिजेत असंही यावेळी ज्योती मेटे (JYOTI METE) यांनी म्हटलं आहे.

ज्योती मेटे स्वतः निवडणूक रिंगणात उतरणार असल्याची शक्यता आहे. तर बीडमधून त्यांनी चाचपणी सुरू केली आहे. आम्ही निवडणुका ज्या ठिकाणी जिंकेल असं वाटतं त्याच ठिकाणी लढवणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली आहे. आज मनोज जरांगे पाटील याची राजकीय भूमिका ठरली नाही अजून त्यामुळे त्यांच्याशी बोलणी झाली नाही, आम्ही बोलणी सगळ्यांशी बोलणार आहोत, असंही त्यांनी यावेळी म्हटलं आहे.

जाती आणि समाजाचा निर्णय नाही तर मानसिकतेचा मुद्दा आहे, मन दुभंगले नाही पाहिजे याची काळजी सरकारने घेतला पाहिजे. विनायक मेटे यांची पण ओबीसीमधून आरक्षण मिळावी अशी मागणी होती, आज ही ओबीसीमधून आरक्षण मागणी आहे. समाजाचे हित लक्षात घेऊन मराठा आरक्षण मागणी जरांगे पाटील करत आहे, असंही त्यांनी यावेळी म्हटलं आहे.

लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान ज्योती मेटे यांनी शरद पवार, देवेंद्र फडणवीस यासारख्या दिग्गज नेत्यांची भेट घेतली होती. लोकसभा निवडणुकीत मात्र त्यांनी कोणालाच जाहीर पाठिंबा दिला नव्हता, यावेळी त्या विधानसभा निवडणुकीत उतरण्याची शक्यता आहे.



### सरकारने सर्वपक्षीय बैठकीला बोलावलं तर जाऊ

» आरक्षण मुद्द्यावर सरकारने सर्वपक्षीय बैठकीला बोलावलं तर जाऊ, पण आम्हाला बोलावलंच पाहिजे अशी आमची भूमिका आहे. कारण मेटे साहेब आरक्षणासाठी अनेक वर्षे लढत होते. त्यामुळे आम्हाला बोलावलं पाहिजे, असंही ज्योती मेटे यांनी म्हटलं आहे. जाती आणि समाजाचा निर्णय नाही तर मानसिकतेचा मुद्दा आहे, मन दुभंगले नाही पाहिजे याची काळजी सरकारने घेतला पाहिजे. विनायक मेटे यांची पण ओबीसीमधून आरक्षण मिळावी अशी मागणी होती, .

### दिग्गज नेत्यांची भेट घेतली

» आज ही ओबीसीमधून आरक्षण मागणी आहे. समाजाचे हित लक्षात घेऊन मराठा आरक्षण मागणी जरांगे पाटील करत आहे, असंही त्यांनी यावेळी म्हटलं आहे. लोकसभा निवडणुकीच्या दरम्यान ज्योती मेटे यांनी शरद पवार, देवेंद्र फडणवीस यासारख्या दिग्गज नेत्यांची भेट घेतली होती. लोकसभा निवडणुकीत मात्र त्यांनी कोणालाच जाहीर पाठिंबा दिला नव्हता, यावेळी त्या विधानसभा निवडणुकीत उतरण्याची शक्यता आहे.

# श्रीरामांच्या पूर्णाकृती शिल्पाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण

## विधानसभेत लोकसभेसारखे गाफील राहू नका,असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले

**पुणे | प्रतिनिधी**

“हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी आयोध्येतील श्रीराम मंदिर उभारणीचे पाहिलेले स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पूर्ण केले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काश्मीरमधील कलम ३७० ही हटवले. आता लाडक्या बहिणींकडून योजनेचे जोरदार स्वागत होत आहे. लाडका भाऊ, ज्येष्ठ नागरिकांसह अनेक योजना कार्यरत होत आहेत.

विधानसभा निवडणुकीनंतर विरोधकांना काहीही काम राहणार नाही. मात्र, सर्व श्रीरामभक्तांनी आगामी विधानसभेत लोकसभेसारखे गाफील राहू नका,’ असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. हांडेवाडी रस्त्यावरील श्रीराम चौकात शिवसेना शहरप्रमुख प्रमोदनाना भानगिरे यांनी स्वखर्चातून उभारलेल्या देशातील सार्वजनिक ठिकाणी पहिल्या पूर्णाकृती श्रीराम शिल्पाचे उद्घाटन व लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात उपस्थित नागरिकांशी संवाद साधताना ते बोलत होते.

यावेळी विधान परीषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार चेतन तुपे पाटील, विधान परिषद सदस्य आमदार योगेश टिळेकर, माजी राज्यमंत्री विजय शिवतारे ,म्हाडाचे अध्यक्ष व माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील,शहर प्रमुख नाना भानगिरे, मंगेश चिवटे, आदींसह शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील श्रीरामभक्त मोठया संख्येने यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, “प्रभू श्रीरामाच्या हातात धनुष्यबाण आहे आणि तो शिवसेनेकडे आहे. प्रभू रामचंद्र आमच्या अस्मितेचा आणि श्रद्धेचा विषय आहे. विरोधकांनी त्याचे राजकारण केले आहे. त्यामुळे येत्या विधानसभा निवडणुकीत त्यांना धडा शिकवायचा आहे.



### ....,पण नाना कामे मोठी करतो

» एवढ्या भर पावसात प्रभू श्रीरामाचे लोकार्पण झाले आहे. प्रमोद नाना दिसतो छोटा पण कामे मोठे करतो. तो पक्का राम भक्त व छत्रपतींचा मावळा आहे. पुण्यातील पूरस्थितीत त्याने स्वतः स्वयंसेवकांना घेऊन लोकांना मदत केली. श्रीराम शिल्पाच्या उभारणीने त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली आहे.’नानाला सांगितलेले काम कधीही तो अर्धवट सोडून देत नाही. तो ते जिद्दीने पूर्ण करतो,हे या श्रीरामाच्या शिल्प उभारणीतून दिसून येते. नानाच्या या कामाबद्दल त्याला द्यावे तेवढे धन्यवाद थोडे आहेत ,असे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी काढले..

“ आज श्रीराम भक्तांच्या मनात असलेले श्रीराम या शिल्पाच्या रूपातून ऊर्जास्त्रोत देत राहतील. मुख्यमंत्री यांच्या हस्ते या शिल्पाचे लोकार्पण होत आहे. भर पावसातही रामभक्त व नागरिकांनी या सोहळ्यात सहभाग नोंदवला हे माझे मोठे भाग्य आहे .मिळणारे समाधान मोठे आहे.

- प्रमोद नाना भानगिरे (शहर प्रमुख ,शिवसेना)

# इच्छुकांची फ्लेक्सबाजी जोमात, क्षेत्रीय अधिकारी कोमात

## चौका-चौकात लावले जाताहेत विनापरवानगी फ्लेक्स, अधिकाऱ्यांकडून कारवाई करण्यास टाळाटाळ

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा आणि महापालिका निवडणुकीसाठी इच्छुक असणाऱ्यांकडून शहरातील चौका-चौकात, गल्लो-गल्ली, सिग्नलवर विनापरवानगी बेकायदेशीर फ्लेक्स लावून शहराचे विद्रुपीकरण केले जात आहे. तर विधानसभा निवडणूक असो की महापुरुषांची जयंती राजकारण्यांसह सामाजिक कार्यकर्त्यांकडून देखील फ्लेक्सबाजी सुरू आहे. यावर क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून कोणतीही कारवाई केली जात नाही. उलट त्या फ्लेक्सकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून फ्लेक्स लावणाऱ्यांना आणखी प्रोत्साहन दिले जात आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत कोठेही फ्लेक्स लावण्यासाठी त्या-त्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांची तर होर्डिंग उभे करण्यासाठी आकाशचिन्ह व परवाना विभागाकडून सशुल्क परवानगी घेणे बंधनकारक आहे. परवानगी दिलेल्या कालावधीनंतर संबंधितांनी लावलेले फ्लेक्स काढले नाही, तर महापालिकेकडून कारवाई केली जाते. मात्र, महापालिकेची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता शहरातील विविध रस्ते, चौक, पदपथ, इमारती आणि सार्वजनिक ठिकाणी अनधिकृतपणे फ्लेक्स लावले जात आहेत. पण, होर्डिंग उभे करण्यासाठी आकाशचिन्ह व परवानगी दिल्याशिवाय उभे केले जात नाही. विनापरवानगी फ्लेक्समुळे महापालिकेचे उत्पन्नावर पाणी पडू लागले आहे.

पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा मतदारसंघात निवडणूक जशी जवळ येत आहे. तसे सर्वपक्षीय इच्छुक उमेदवारांनी फ्लेक्सबाजी सुरुवात केलेली आहे. विना परवानगी फ्लेक्सबाजीला चाप लावण्यासाठी महापालिकेकडून केली जाणारी कारवाईचा केवळ फार्सच ठरत आहे. आगामी निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून इच्छुकांकडून विविध कारणाने चौका-चौकांत आणि रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात फ्लेक्सबाजी केली जात आहे.

शहरात अनधिकृत फ्लेक्सबाजी, जाहिरातबाजी आणि होर्डिंगचा आलेख दिवसेंदिवस वाढतच आहे. अनेक वेळा हे फ्लेक्स पदपथ अडवून उभारले जातात. त्यामुळे नागरिकांना पदपथावर चालणे जीकिरीचे ठरते. परिणामी, पादचाऱ्यांना मुख्य रस्त्यावरून चालावे लागत आहे.




### क्षेत्रीय अधिकारी भाऊ-दादांचे बनले कार्यकर्ते

» महापालिका हद्दीतील क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत चौका-चौकात, सिग्नल, गल्लो-गल्लीत लागलेल्या एकाही फ्लेक्सवर महापालिकेची परवानगी दिसत नाही. महापालिकेच्या क्षेत्रीय अधिका-यांकडून परवानगी घेऊन फ्लेक्स लावणे बंधनकारक आहे. पण, क्षेत्रीय अधिकारी भाऊ-दादाचे कार्यकर्ते असल्यासारखे वागू लागल्याचे दिसत आहे. त्यामुळे अशा बेकायदा जाहिरातबाजीवर महापालिकेकडून कारवाई करणार कोण, असा सवाल उपस्थित होत आहे..

### आढळरावांना पुन्हा डावलले

» विधानसभा निवडणूक दोन महिन्यांवर येऊन ठेपली आहे. शहरातील विधानसभा मतदारसंघांतून उमेदवारी मिळावी, यासाठी सर्वपक्षीय उमेदवारांकडून गेल्या काही महिन्यांपासून प्रयत्न सुरू आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीचे जागा वाटप अद्याप झालेले नसले. तरी प्रत्येकाने मतदारसंघात नाव चर्चेत राहण्यावर भर दिला आहे. यासाठी पक्षातील ज्येष्ठ व वजनदार नेत्यांच्या गाठी-भेटींपासून ते मतदारांची कामे करणे, त्यांच्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम राबविण्याचा सपाटा या इच्छुकांनी लावला आहे. मतदार संपर्क आणि मतदारांना आकर्षित करण्यासाठी विविध उपक्रम आयोजित केले जात आहेत. तसेच इच्छुक असल्याने वाढदिवस भव्य प्रमाणात साजरे करण्याचे प्रमाण वाढले आहे. भोसरी-पिंपरीतील इच्छुकांनी मतदारांशी जवळीक साधण्यासाठी नव्या नव्या क्लृप्त्या शोधल्याचे त्यांच्या फ्लेक्सवर दिसते.

> शहरात विविध चौकात, पदपथ, सिग्नलवर लागलेल्या फ्लेक्सवर कारवाईचे अधिकार हे क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिलेले आहेत. फ्लेक्स लावण्यासाठी देखील त्यांचीच सशुल्क परवानगी घेणे बंधनकारक आहे. मोठ्या होर्डिंगच्या परवानग्या घेतलेल्या असतात. मात्र, पदपथ व विनापरवानगी घेतलेल्या फ्लेक्स बॅनरवर कारवाईचे अधिकार क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिले आहेत.
>
> **- संदीप खोत, उपायुक्त, आकाशचिन्ह व परवानगी विभाग, महापालिका**

# पिंपरीत आता अतिरिक्त सत्र न्यायालय आणि वरिष्ठ स्तर न्यायालय मंजूर

## गेल्या अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या पिंपरी-चिंचवड न्यायालयासाठी दोन वरिष्ठ न्यायालय मिळण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या पिंपरी-चिंचवड न्यायालयासाठी दोन वरिष्ठ न्यायालय मिळण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे. याबाबत जिल्हा आणि सत्र न्यायालयाने अतिरिक्त सत्र न्यायालय आणि वरिष्ठ स्तर न्यायालय पिंपरीसाठी मंजूर केले आहेत. पुणे जिल्हा मुख्य न्यायालयाचे न्यायाधीश महेंद्र महाजन यांनी याबाबत आदेश काढले आहेत. तसेच त्यासाठी स्वतंत्र मनुष्यबळ मिळणार आहे. पिंपरी येथील जुन्या मोरवाडी न्यायालयात हे न्यायालय सुरू होण्याची शक्यता आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या, खटल्यांचे प्रमाण आणि पोलीस ठाणे यांची वाढती संख्या लक्षात घेता सध्या न्यायालय कमी पडत आहे. त्यामुळे या ठिकाणी वरिष्ठ न्यायालय व्हावे, अशी मागणी अनेक वर्षांपासून पिंपरी-चिंचवड ॲडवोकेट बार असोसिएशन होत होती. त्यानुसार आता दोन नवे न्यायालय मिळण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे. सद्यस्थितीत नेहरुनगर या ठिकाणी न्यायालय सुरू आहे. मात्र, अनेक खटल्यांसाठी पुणे न्यायालयात पक्षकारांना जावे लागते. परिणामी आता पुण्यातील हेलपाटे वाचणार आहेत.



### हे खटले चालणार पिंपरीत

» महिलांविषयी असलेले कौटुंबिक व घरगुती खटले, फौजदारी, मोठ्या रकमेचे दावे, पिंपरीतील प्रलंबित दावे, ज्या दाव्यांमध्ये पुणे जिल्हा न्यायालयात जावे लागत होते, असे दावे त्याचप्रमाणे अपील देखील या ठिकाणी करता येणार आहेत. त्यामुळे पिंपरी-चिंचवड व लगतच्या ग्रामीण भागाला या न्यायालयाचा मोठा फायदा होणार आहे.

> पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र सत्र न्यायालय, वरिष्ठ न्यायालयासाठी गेल्या सात वर्षांपासून पाठपुरावा सुरू आहे. त्यास न्यायालयाची मंजुरी मिळाली असून, त्याबाबतचे जागा व फर्निचर उपलब्ध आहे. लवकरात लवकर ते सुरू व्हावे यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांची भेट घेणार आहोत. त्याचप्रमाणे आमची आणखी वरिष्ठ न्यायालय होण्याची मागणीही असणार आहे. शहरातील नागरिकांना याचा मोठा फायदा होणार आहे.
>
> **- अतिश लांडगे, अध्यक्ष, महाराष्ट्र व गोवा नोटरी असोसिएशन, पिंपरी-चिंचवड**

# आमचे सरकार देणारे, घेणारे नाही : उपमुख्यमंत्री अजित पवार

**अजित पवार यांच्या जनसन्मान यात्रे निमित्ताने राजगुरूनगर येथे महिलांचा मेळावा झाला, यावेळी मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते.**



**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील पोलिस पाटील, आशा वर्कर, अंगणवाडी ताई आदीच्या मानधनात वाढ केली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत 1500 महिना दिला. आता सरपंचाच्या मानधनात लवकरच वाढ करू, असे आश्वासन देत आमचे सरकार देणारे आहे, परत घेणारे नाही.अशा स्पष्ट शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधकांवर तोफ डागली.

अजित पवार यांच्या जनसन्मान यात्रे निमित्ताने राजगुरूनगर येथे महिलांचा मेळावा झाला. यावेळी मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार बोलत होते. अजित पवार म्हणाले की, राज्य आणि जिल्ह्यासह खेड तालुक्याचे अनेक प्रश्न सोडवले आहेत.

आमदार दिलीप मोहितेच्या माध्यमातून पाच वर्षात सव्वाचार हजार कोटीचा निधी खेड तालुक्याला दिला आहे. भोरगिरी-भीमाशंकर हा ड्रीम प्रोजेक्ट हाती घेतला आहे. त्यामुळे आदिवासी भागाचा विकास होईल.आदिवासी भागातील नागरिकाच्या घरकुलाचा प्रश्न सोडवला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

या कार्यक्रमात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनांतर्गत दिव्यांग महिला शुभांगी शिंदे हिला 1500 रुपयांचा प्रतिकृती धनादेश अजित पवार यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. तालुका अध्यक्ष कैलास सांडभोर यांनी आभार मानले.

त्यांना लोकसभा निवडणुकीत अपयश आले. आजच्या जाहीर कार्यक्रमात त्यांना उघडपणे डावलण्यात आल्याने व कार्यक्रमाच्या तालुका भर झळकलेल्या फ्लेक्समध्ये पण आढळराव पाटील यांना कोठेही स्थान देण्यात आले नाही.

यामुळे आढळराव पाटील आणि त्यांच्या समर्थकांना ना घर का ना घाट का अशी अवस्था झाली असल्याचे मानले जात आहे. दरम्यान, या पार्श्वभूमीवर आढळराव यांना विचारले असता आपणांस निमंत्रण नसल्याने सहभागी झालो नाही. त्याबाबत आपली तक्रार नाही, असे त्यांनी म्हटले आहे.

संविधानाबाबत चुकीचा प्रचार करून लोकसभेसाठी मतदान मिळवले, असा आरोप करीत आदिवासी, अनुसूचित जाती आणि मुस्लिम समाजासाठी विविध योजना सरकारने आखल्या आहेत.

त्यातून या घटकाची उन्नती केली जाईल. लोकाभिमुख सरकार आणण्यासाठी महायुतीला साथ द्या. महायुतीच्या विचारांचे सरकार निवडून द्या, असे आवाहन, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. आमचे सरकार देणारे आहे, परत घेणारे नाही. अशा स्पष्ट शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधकांवर तोफ डागली.

### आढळरावांना पुन्हा डावलले

» उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जन सन्मान यात्रे निमित्त खेड तालुक्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत असलेल्या आढळराव यांचा निवडणुकीच्या तोंडावर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश झाला. आयोजित केलेल्या युवक व महीला मेळाव्याच्या कार्यक्रमात माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना स्थान मिळाले नसल्याचे समोर आले आहे. त्यांना लोकसभा निवडणुकीत अपयश आले. आजच्या जाहीर कार्यक्रमात त्यांना उघडपणे डावलण्यात आल्याने व कार्यक्रमाच्या तालुका भर झळकलेल्या फ्लेक्समध्ये पण आढळराव पाटील यांना कोठेही स्थान देण्यात आले नाही.

### परवानगी रद्द करण्याच्या सूचना

» यामध्ये प्राधिकरण क्षेत्रात युडीसीपीआर नियमावलीतील कलम २७.२ चे संदर्भ देत हे बंधन घातले. ज्या विकसकांनी असे प्रमाणपत्र दिले आहे; परंतु प्रत्यक्षात त्या गृहप्रकल्पांना पाणी पुरवठा केला जात नसेल, तर त्यांच्या परवानगी रद्द करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

# विधानसभा निवडणुकीची तयारी सुरु शिरूर-हवेलीत इच्छुक बोहल्यावर

**सर्वच पक्षांनी विधानसभा निवडणुकीची तयारी सुरु केली आहे. राजकीय पक्षांबरोबरच इच्छुक उमेदवारांनीही आपापली तयारी सुरु केली आहे.**




**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर सध्या विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहे. सर्वच पक्षांनी विधानसभा निवडणुकीची तयारी सुरु केली आहे. राजकीय पक्षांबरोबरच इच्छुक उमेदवारांनीही आपापली तयारी सुरु केली आहे.

वेगवेगळ्या संस्थांकडून संपूर्ण मतदारसंघाचा सर्व्हे करणे, मतदारसंघातील आपल्या नव्या – जुन्या कार्यकर्त्यां बरोबरच काठावरील मतदारांच्या घरी व त्यांच्या कार्यक्रमांना आवर्जून भेट देणे, विविध तीर्थक्षेत्रांच्या मोफत यात्रा आयोजित करणे आदी कार्यक्रम सध्या जोरदार सुरु आहेत. त्यामुळे शिरुर-हवेली विधानसभा मतदारसंघात निवडणुक जवळ आली आहे हे स्पष्ट दिसत आहे. महाविकास आघाडीकडून विद्यमान आमदार अशोक पवार यांची उमेदवारी निश्चित आहे.

लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर लगेचच अशोक पवार यांनी मतदारसंघात जनसंपर्क वाढवला आहे. आमदार अशोक पवार यांची उमेदवारी निश्चित असल्याने त्यांनी कार्यकर्त्यांच्या बैठका, प्रमुख कार्यकर्त्यांशी चर्चा आणि मतदारसंघात वेगवेगळ्या कार्यक्रमांना भेट देणे या सर्वांच्या माध्यमातून विधानसभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले आहे.

दुसऱ्या बाजूला महायुती एकत्रितपणे विधानसभा निवडणूक लढविणार असे सांगितले जात असले तरी ऐनवेळेस एखादा वेगळाच निर्णय होऊ शकतो. या निवडणूकीत महायुतीच्या वतीने जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष प्रदीप कंद उमेदवार असण्याची शक्यता आहे.

### अशोक पवार यांची जमेची बाजू

» नुकतीच लोकसभा निवडणूक पार पडली. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) उमेदवार अमोल कोल्हे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) शिवाजीराव आढळराव पाटील यांचा पराभव करून विजय मिळवला. या निवडणुकीत आमदार अशोक पवार यांनी एकहाती यंत्रणा राबवून प्रचार केला. त्यामुळे शिरूर विधानसभा मतदारसंघात अमोल कोल्हे यांना निर्णायक आघाडी मिळाली.

### हवेलीकरांच्या अस्मितेचा प्रश्न

» सर्वच इच्छुक उमेदवारांचा वेगवेगळ्या कारणांमुळे गेल्या पाच वर्षांत हवेली तालुक्यात संपर्क कमी झाला आहे. त्यामुळे हवेली तालुक्यात नेतृत्वाची एक पोकळी निर्माण झाली आहे. या पोकळीचा फायदा घेऊन आपले नेतृत्व प्रस्थापित करण्यासाठी प्रदीप कंद प्रयत्न करत आहेत. या साठी प्रदीप कंद हवेली तालुक्याची अस्मिता जागृत करण्याचे काम करत आहेत. हवेली तालुक्यावर सुरवातीला पुरंदर तालुका व आता शिरूर तालुका अन्याय करत आहे असे मत ते मांडत आहेत.